सकाळ
कोल्हापूर, शनिवार, २ नोव्हेंबर २०२४

# विकासाच्या गाडीला हवा ‘सुविधांचा बुस्टर’

## निधीबाबत योग्य नियोजनासह अंमलबजावणीची आवश्यकता

**विकासवाट**
**पायाभूत सुविधा** | **उदयसिंग पाटील**

**जिल्ह्यातील विकासाची गाडी वेगाने धावायची असेल तर पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्याबरोबरच ते सक्षम ठेवले पाहिजे. पण, सध्या गावपातळीपासून महापालिकांपर्यंत केवळ दाखविण्यासाठीच्या सुविधा दिल्या जात आहेत. त्यातून नागरिकांना पूर्ण समाधान होत नाही. नागरिकांच्या आरोग्य संवर्धनाबरोबरच आर्थिक विकासाच्यादृष्टीने पाहिले तर मोठ्या प्रमाणावर काम करण्याची गरज आहे. विकास प्राधिकरणाची स्थापना झाली. पण, त्यातून विकास करण्यासाठी लागणाऱ्या निधीबाबत तरतूद नसल्याने हा अर्धवट प्रकार काहीच उपयोगाचा होत नाही. त्यामुळे निधीचे नियोजन-उपलब्धता, योग्य अंमलबजावणीची नितांत आवश्यकता असून, योग्य यंत्रणाही नेमली पाहिजे.**



“ शहरातील तसेच विविध ठिकाणांच्या पर्यटनस्थळांवरील पायाभूत सुविधांची अवस्था पाहिली तर पुन्हा ते पर्यटक येण्याचे धाडस करणार नाहीत. याकरिता लोकप्रतिनिधींबरोबरच अधिकाऱ्यांनी ठोस प्रयत्न केले पाहिजेत. जिथे ज्या सुविधांची गरज आहे, त्याचसाठी निधी मंजूर करून ती कामे वेळेत संपविण्याचे प्रयत्न हवेत. दळणवळणातील रस्ते हा प्रमुख घटक आहे. त्यांचे नियोजन व्यवस्थित केले तर जिल्ह्यातील विकासाला गती येईल. सांडपाणी प्रक्रिया तसेच त्याचे वहन ही व्यवस्था शासकीय यंत्रणेनेच उभी केली तर त्यात सुसूत्रता येऊन सध्या येत असलेले विविध अडथळे दूर करता येतील.

**- राजीव परीख,**
माजी अध्यक्ष, क्रिडाई महाराष्ट्र



“ शहरातील विकास आराखड्यातील केवळ ५० टक्क्यांवर प्रस्तावित रस्ते झाले आहेत. यामुळे नवीन सुविधा उपलब्ध नसल्याने सध्याच्या रस्त्यांवर ताण येत आहे. अनेक ठिकाणी अतिक्रमणे होत आहेत. त्यासाठी रस्त्यांचे मार्किंग झाले तर त्याला काही प्रमाणात आळा बसेल. याचपद्धतीने तालुकास्तरावर सुविधांचे जाळे तयार करायला हवे. पर्यटन हा जिल्ह्याच्या प्रगतीत मोठा घटक ठरू शकतो. पण, सध्या तिथपर्यंत पोहोचता येत नाही किंवा पोहोचल्यानंतर समाधान मिळू शकत नाही, अशी पर्यटनस्थळांची अवस्था आहे. याकरिता विकास आराखडा फार महत्त्वाचा आहे.

**-विद्यानंद बेडेकर,**
सेक्रेटरी, क्रिडाई महाराष्ट्र



“ कोल्हापूरच्या पायाभूत विकासासाठी लोकप्रतिनिधी आणि मतदारांनी सकारात्मक विचारसरणीचा अवलंब केला पाहिजे. जिल्ह्यामध्ये मोठे औद्योगिक प्रकल्प येण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. विकास आराखडा तयार करत असताना धरणातील गाळांचा विचार करावा लागेल. तसेच पर्यटन आराखडाही नियोजनपूर्वक राबविणे गरजेचे आहे. कला व क्रीडा पंढरी अशी असलेली ओळख जपण्यासाठीही त्याबाबतच्या सुविधांसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील.

**डॉ. सुनील भोसले,**
विवेकानंद कॉलेज

### प्रश्न

- रस्ते विकास, शहर हद्दवाढीला होणारा विरोध
- शहरानजीक साठत चाललेला कचरा
- धरणातील गाळांमुळे महापुराच्या तीव्रतेचा धोका
- खासगी सांडपाणी प्रकल्पातील पाणी सोडायचे कुठे?
- थेट पाईपलाईन योजनेतील पाणी वितरणात अडथळे

### सद्य:स्थिती

- सुविधांबाबतच्या उभारणीत प्रशासन उदासीन
- जुन्या सेवा वाहिन्यांचे आयुर्मान संपलेले
- अरुंद रस्त्यांमुळे वाहतूक कोंडीची समस्या
- विकास प्राधिकरणाची अवस्था हातपाय बांधलेली
- शहर वाढण्यास राजकीय पातळीवर विरोध

### उपाययोजना

- रस्त्यांच्या उभारणीसाठी प्राधान्य हवे
- रस्त्यांच्या जागा संपादनासाठी योग्य मोबदला द्यावा
- ग्रामीणच्या सांडपाण्यावर प्रभावी उपाययोजना हवी
- घनकचरा प्रकल्पांची मोठ्या संख्येने उभारणी आवश्यक
- विकास आराखडा राबविण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नेमावेत

04/11/24